निलंबन कालावधीचा निर्णय घेणेबाबत.
श्री. बल्लाळ प्रतिम दिपक, तत्कालीन कनिष्ठ
सहाय्यक, प्रा.आ.केंद्र जेऊर ता नगर

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-१/अस्था-३/३३२२/३१८/२०२५
अहिल्यानगर दिनांक २५/०३/२०२५

वाचा:-१. इकडील निलंबन आदेश जा.क्र.साप्रवि/आस्था-३/३३२२/१००५/२०२२ दिनांक २५/०८/२०२२
२. इकडील ज्ञापन/दोषारोपपत्र जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/३३२२/८६/२०२३ दिनांक १८/०१/२०२३
३. इकडील चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी नेमणुक आदेश जा.क्र. साप्रवि/आस्था-३ ३३२२/५११/२०२३ दिनांक २१/०४/२०२३
४. सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्र. विशा.४/खाचौ/ सी.आर.९०/२०२३ दि २६/०७/२०२३ प्राप्त दि ३०/१०/२०२३
५. या कार्यालयाकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.साप्रवि-१/आस्था-३/ ३३२२/१३१/२०२४ दिनांक १८/०१/२०२४
६. श्री. बल्लाळ प्रितम दिपक, कनि सहा यांचेकडील खुलासा दि ०९/०२/२०२४ प्राप्त दिनांक २०/०३/२०२४
७. इकडील आदेश जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/६००१९/९०५/२०२४ दिनांक ११/०७/२०२४
८. गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपुर यांचेकडील पत्र जा.क्र. आस्था-१/४२५/२०२५ दिनांक १३/०१/२०२५
९. इकडील कारणे दाखवा नोटीस जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/३३२२/११५/२०२५ दिनांक २४/०२/२०२५
१०. गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपुर यांचेकडील पत्र जा.क्र.आस्था-१ २४८/२०२५ दिनांक १०/०३/२०२५ समवेत श्री बल्लाळ यांचा खुलासा
११. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ७२ पोटनियम (३), (४), (५)

श्री बल्लाळ प्रतिम दिपक, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) या पदावर प्राथमिक आरोग्य केंद्र जेऊर ता.नगर येथे कार्यरत असताना कार्यालयीन कामकाजात हलगर्जीपणा करुन कामकाज प्रलंबित ठेवून कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर अदा न केल्याने कर्मचाऱ्यांना सोसायटीचे भरावे लागलेले अतिरिक्त व्याज, ऑडीट करावयाचे अभिलेखे गहाळ करणे व त्या बाबत कोतवाली पोलीस स्टेशन येथे फिर्याद नोंदवून कामात केलेला हलगर्जीपणा, वरिष्ठाचे आदेशाची अवमानता करुन कार्यालयीन शिस्तीचे उल्लघंन करणे, तसेच ग्रामिण पाणी पुरवठा येथील जलजीवन मिशन अंतर्गत ई-निविदेचे कामात गैरप्रकार व हलगर्जीपणा इत्यादी गैरवर्तन केल्याने संदर्भ क्रमांक १ अन्वये तुम्हास जिल्हा परिषद सेवेतुन सेवा निलंबीत करणेत आले होते.

संदर्भ क्रमांक २ अन्वये सदर प्रकरणी श्री बल्लाळ यांना ज्ञापन दोषारोपपत्र बजावणेत येऊन खुलासा सादर करणेबाबत कळविणेत आलेले होते. संदर्भ क्र.३ चे खुलाशात श्री बल्लाळ यांनी त्यांचेवर दोषारोपपत्रात ठेवण्यात आलेले आरोप अमान्य केलेने संदर्भ क्र.४ नुसार, श्री बल्लाळ यांचे विरुध्द विभागीय

चौकशी सुरु करणेत आली. संदर्भ क्र.५ चे सहाय्यक आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग नाशिक, यांचेकडील चौकशी पुर्ण होऊन चौकशी अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला. सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने संदर्भ क्रमांक ५ अन्वये अंतिम कारणे दाखवा नोटीस बजावुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (२) नुसार, श्री बल्लाळ यांच्या पुढील दोन वेतनवाढी तात्पुरत्या स्वरुपात थोपविणे ही शिक्षा का करणेत येऊ नये? या बाबत खुलासा सादर करणे बाबत कळविणेत आले. तरी श्री बल्लाळ यांचेवरील गैरवर्तनाबाबत दोषारोप, विभागीय चौकशी अहवालातील निष्कर्ष व श्री बल्लाळ यांनी सादर केलेला खुलासा मान्य करणेत येत येऊन श्री बल्लाळ यांना सदर प्रकरणी दोषमुक्त करणेत आलेले आहे.

श्री बल्लाळ प्रितम दिपक यांचा दिनांक २५/०८/२०२२ ते दिनांक २१/०४/२०२३ अखेर एकुण २४० दिवस सेवा निलंबन कालावधीचा निर्णय घेणेची बाब विचाराधीन होती.

या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक ९ नुसार श्री. बल्लाळ यांना नोटीस बजावुन खुलासा मागविणेत आला होता. श्री बल्लाळ यांनी संदर्भ क्रमांक १० नुसार खुलासा सादर करुन त्यांना प्रकरणी दोषमुक्त करणेत आलेले असलेने त्यांचा सेवा निलंबन कालावधी हा सर्व प्रयोजनार्थ सेवा कालावधी म्हणुन ग्राह्य धरणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

श्री. बल्लाळ यांचेवरील विभागीय चौकशी मधील आरोप सिध्द होत नसलेने तसेच संदर्भ क्रमांक ७ नुसार श्री बल्लाळ यांना प्रकरणी दोषमुक्त करणेत आलेले असलेचे पाहता संदर्भ क्रमांक ११ मध्ये नमुद केलेल्या नियमातील तरतुदीनुसार निम्न स्वाक्षरीत नियुक्ती प्राधिकरणास प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, श्री बल्लाळ प्रितम दिपक यांचा दिनांक २५/०८/२०२२ ते दिनांक २१/०४/२०२३ अखेर एकुण २४० दिवस सेवा निलंबन कालावधी हा सेवेच्या सर्व प्रयोजनार्थ सेवा कालावधी म्हणुन धरण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री बल्लाळ प्रितम दिपक, कनिष्ठ सहाय्यक, यांच्या मुळ सेवा पुस्तकात घेणेत यावी.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२५०३२५०४००४० असा आहे.

Signed by
Sambhaji Bhagwantrao Langore
Date: 09-04-2025 18:01:42
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री बल्लाळ प्रितम दिपक, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती श्रीरामपुर
द्वारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपुर
२/- सदर आदेश संबंधितास बजावुन बजावलेबाबतची तारखेसह स्वाक्षरीची पोहोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रत :- निवडनस्ती.